मंगळूरमार्गे जाणारी पूर्णा एक्स्प्रेस आठवड्यातून तीनवेळा सुरु करा : व्यापारी संघटना

केसरी वृत्तसेवा

सांगली : व्यापारी, नोकरदार, उद्योजक व पर्यटनासाठी जाऊ पाहणाऱ्या सातारा, कोल्हापूर, सांगली, बेळगाव जिल्ह्यातील प्रवाशांसाठी मंगळूरला जाण्यासाठी सध्या कोणतीही दैनंदिन गाडी उपलब्ध नाही. त्यामुळे कर्नाटक व केरळ येथील व्यापारी संघटनांनी रेल्वे तसेच जिल्ह्यातील खासदारांकडे हा प्रश्न मांडला आहे.

व्यापारी संघटनांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पंधरा वर्षापूर्वी मिरज-मंगळूर जुनी महालक्ष्मी एक्स्प्रेस रद्द करण्यात आली. आता आठवड्यातून मंगळूरला जाण्यासाठी पुर्णा एक्सप्रेस ही एकमेव साप्ताहिक गाडी आहे. त्यामुळे सातारा, कराड, कोल्हापूर, सांगली, बेळगाव, येथील लोकांना मंगळुरूला जाण्यासाठी खूप कसरत करावी लागत आहे. चार जिल्ह्यातून केरळला कामानिमित्त जाणाऱ्यांची संख्या मोठी आहे. याशिवाय मंगळूर येथे पर्यटनासाठी जाऊ इच्छिणाऱ्यांनाही रेल्वेचा दैनंदिन पर्याय उपलब्ध नाही. कोणत्याही व्यक्तीला तातडीच्या वेळी मंगळूरला किंवा त्या भागातून या चारही जिल्ह्यात येण्यासाठी पर्याय उपलब्ध नाही.

त्यामुळे प्रतिष्ठित जुनी महालक्ष्मी एक्स्प्रेस (मिरज ते मंगळूर), अर्सिकेरेमार्गे दररोज सुरु करावी. सातारा, मिरज, बेळगाव, लोंढा, मडगाव, मंगळूरमार्गे जाणारी एकमेव साप्ताहिक रेल्वे (क्र. ११०९७ व ९८) पूर्णा एक्स्प्रेस आठवड्यातून तीनवेळा सुरु करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सांगलीचे खासदार विशाल पाटील यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले आहे. व्यापारी संघटनांनी सांगलीच्या नागरिक जागृती मंचचे अध्यक्ष सतीश साखळकर यांच्याशीही चर्चा केली. संघटनांनी एकत्र येत यासाठी पाठपुरावा करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. निवेदनावर कर्नाटक, केरळ व्यापारी असोसिएशनचे फिरोस ए. पी., अर्शद के. पी., रेनी जॉर्ज, गेनू जॉय, सुरेश टी. जी., बेंझी बाबू जॉर्ज, मुजीब पी. सी., विजयन टी, फरशीद ए. पी., सजीवन यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

वंदे भारत एक्सप्रेसची मागणी

कर्नाटक, केरळ व्यापारी संघटनेने रेल्वेकडे वंदे भारत एक्सप्रेसची मागणी केली आहे. आर्सिकेरे मार्गे कोल्हापूर ते मंगळूर या मार्गावर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू करण्याचा प्रस्ताव त्यांनी दिला आहे.

मंगळूरला जाण्यासाठी येत असलेल्या प्रवाशांच्या अडचणींचा विचार करुन आम्ही त्याबाबत पाठपुरावा करणार आहोत. यापूर्वीही रेल्वेकडे या गाडीबाबत पत्रव्यवहार केला होता. मात्र, रेल्वेकडून प्रवाशांची मागणी दुर्लक्षित करण्यात आली.

– सतीश साखळकर, अध्यक्ष, नागरिक जागृती मंच

भरधाव ट्रकची स्ट्रीट लाईट खांबास धडक

केसरी वृत्तसेवा

सांगली : भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकने महापालिकेच्या स्ट्रीट लाईट खांबास धडक दिल्याची घटना शहरातील संजयनगर परिसरात घडली. यामध्ये मनपाचे ६५ हजाराचे नुकसान झाले आहे. ट्रकचालकाने घटनास्थळावरुन पलायन केल्याने पोलिसांनी अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

संजयनगर येथील खेराडकर पेट्रोलपंप ते औद्योगिक वसाहतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मध्यभागी महापालिकेने स्ट्रीट लाईट खांब उभारला आहे. दि. २५ मे रोजी सायंकाळी ६ ते ७ या कालावधीत त्या खांबास भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने (क्र.एमएच १२ एचडी ३७४७) जोरदार धडक दिली. यामध्ये खांब वाकला. सुदैवाने खांबाजवळ कोणी नसल्याने जिवीतहानी झाली नाही. खांब वाकल्याचे पाहताच ट्रकचालक तेथून पसार झाला.

'मनपा' कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे २५ हजाराचा मोबाईल परत मिळाला

नागरिकांनी मानले कर्मचाऱ्याचे आभार

केसरी वृत्तसेवा

सांगली : महापालिका प्रभाग ९ मधील कचरा घंटागाडीतील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे एका महिला नागरिकाचा कचऱ्यातून नजर चुकीने आलेला २५ हजाराचा मोबाईल त्या नागरिकांना शोधून पुन्हा परत देण्यात आला. या प्रामाणिकपणाबद्दल नागरिकांनी महापालिका कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

प्रभाग ९ मध्ये सिध्देश्वर हौसिंग सोसायटी येथे सकाळच्या सुमारास महापालिकेची घंटागाडी कचरा संकलित करीत होती. यावेळी येथील गोरे नामक नागरिकाच्या कचऱ्यातून २५ हजाराचा अँड्रॉइड मोबाईल घंटागाडीत पडला. गाडी पुढे गेल्यानंतर गोरे यांना मोबाईल घंटागाडीमध्ये पडल्याचे समजले. त्यानंतर गोरे यानी माजी नगरसेवक संतोष पाटील यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. यानंतर संतोष पाटील यांनी मुकादम बाबासाहेब जाधव यांच्याशी संपर्क साधून संबधित घंटागाडी खाली न करण्याबाबत चालकास सांगण्याबाबत सांगितले. यानंतर स्वच्छता निरीक्षक अतुल आठवले, मुकादम बाबासाहेब जाधव, घंटागाडी चालक नुमान नगाराजी, राजेंद्र थोरात आणि तानाजी लोंढे यानी घंटागाडी त्या नागरिकांच्या घरासमोर नेली आणि त्यांच्या समोरच मोबाईल शोधण्यास सुरुवात केली. यावेळी गोरे यांनी टाकलेल्या कचऱ्यामध्ये मोबाईल आढळून आला. त्यामुळे आपला गेलेला मोबाईल मिळाल्याने गोरे यांनी समाधान व्यक्त करीत मनपा कर्मचारी यांचे आभार मानले.

प्रभाग क्र.९मधील सिध्देश्वर हौसिंग सोसायटीमधील महिलेचा नजरचुकीने कचऱ्यातून आलेला मोबाईल महिलेला परत देताना सफाई कर्मचारी.

'त्या' शिक्षकांच्या तक्रारीत तथ्य नाही

सीईओ तृप्ती धोडमिसे यांची माहिती : शिक्षक जिल्हा अंतर्गत बदली प्रकरण

केसरी वृत्तसेवा

सांगली : जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक जिल्हाअंतर्गत बदली प्रकरणी आमदार विक्रम सावंत यांनी जिल्हा परिषदकडे सादर केलेल्या शिक्षकांच्या तक्रारींपैकी एकाही तक्रारीत तथ्य नसल्याची माहिती जिल्हा परिषद सीईओ तृप्ती धोडमिसे यांनी दिली. या प्रकरणी सामान्य प्रशासनाचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी प्रमोद काळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल सीईओ यांना सादर केला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत बदल्यांमध्ये अन्याय झाला आहे. चुकीच्या पध्दतीने बदल्या केल्या आहेत अशी तक्रार आमदार श्री सावंत यांची होती. या प्रकरणी आ. सावंत यांनी जिल्हा परिषद धाव घेऊन प्रशासनाला फैलावर घेतले होते. या प्रकरणी आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोपही करण्यात आला होता. मात्र प्रशासन सर्व बदल्या नियमानेच झाल्याचे सांगत आहे.

आ. श्री सावंत यांनी जिल्हा परिषदेत येऊन तक्रार केली. सुमारे १९ जणांच्या तक्रारींचे लेखी अर्जच आ. श्री सावंत यांनी सादर केले होते. जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या तोंडावर चौकशी समिती नेमण्यात आली.

चौकशी समितीने नुकताच आपला अहवाल सीईओ श्रीमती धोडमिसे यांना सादर केला. याबाबत श्रीमती धोडमिसे यांना विचारले असता तक्रारीत कोणतेही तथ्य आढळलेले नाही. आम्ही राबवलेली प्रक्रीया बरोबरच आहे असे स्पष्ट केले.

मला अद्याप माहीती मिळाली नाही : आ.सावंत

या बदली प्रकरणी आक्रमक होत तक्रार करणारे व संबधित शिक्षकांचे तक्रारी अर्ज सादर करणारे आ. विक्रमदादा सावंत यांच्याशी संपर्क साधला असता, आपल्याकडे संबधित शिक्षकांनी लेखी तक्रारी दिल्या होत्या. त्याबाबत चौकशी करण्याची मागणी केली होती. जि.प. प्रशासनाने त्याबाबत चौकशी समिती नेमली होती. चौकशी समितीचा अहवालचे काय झाले, तक्रारींमध्ये तथ्य आहे अथवा नाही याबाबत आपल्याला अद्याप माहीती मिळालेली नाही असे स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेतून

जीप खड्ड्यात पडल्याने १४ जणांचा मृत्यू

मुझफ्फराबाद : पाकव्याप्त काश्मीरमध्ये जीप खड्ड्यात पडल्याने झालेल्या भीषण अपघातात १४ जणांचा मृत्यू झाला असून, दोन जण जखमी झाले आहेत.

नीलम खोऱ्यात ही घटना घडल्याचे सरकारी प्रशासक नदीम जंजुआ यांनी सांगितले. ते म्हणाले, बचाव कर्मचाऱ्यांनी मृत आणि जखमींना रुग्णालयात नेले. मात्र, या अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

भारतीय पंतप्रधानांची ४१ वर्षांनंतर ऑस्ट्रियाला भेट

नवी दिल्ली : रशियाच्या दौऱ्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी ऑस्ट्रियाला पोहोचले. मोदींची ऑस्ट्रियाची ही भेट अनेक अर्थाने महत्त्वाची आहे. ४१ वर्षांनंतर ऑस्ट्रियाला भेट देणारे मोदी हे भारतीय पंतप्रधान आहेत. याआधी देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि इंदिरा गांधी यांनी ऑस्ट्रियाचा दौरा केला होता. भारत आणि ऑस्ट्रिया राजनैतिक संबंधांचा ७५ वा वर्धापन दिन साजरा करत असताना पंतप्रधान मोदी यांनी व्हिएन्नाला भेट दिली आहे. ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथे पंतप्रधान मोदींचे जंगी स्वागत करण्यात आले. यानंतर मोदीं म्हणाले की, माझ्या तिसऱ्या कार्यकाळाच्या सुरुवातीला मला ऑस्ट्रियाला भेट देण्याची संधी मिळाली याचा मला आनंद आहे. माझे येथे येणे ऐतिहासिक आणि विशेष आहे. तब्बल ४१ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधान ऑस्ट्रियाला आले आहेत. आमच्या परस्पर संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असताना ही भेट होत आहे, याचा मला आनंद आहे, असे मोदी यांनी नमूद केले.

गव्हाणप्रकरणी माजी खासदारांची जिल्हा परिषदेत धाव

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प प्रकरण

केसरी वृत्तसेवा

सांगली : गव्हाण (ता. तासगाव) येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प प्रकरणी माजी खासदार संजयकाका पाटील यांनी ग्रामस्थांसह जिल्हा परिषदेत धाव घेतली. राबवण्याचा ग्रामपंचायतीचा निर्णयाला ग्रामस्थांचा कडाडून विरोध या प्रकरणी गांभिर्याने चौकशी करून सदरचा निर्णय रद्द करावा व दोषींवर कारवाई करावी अशी मागणी माजी खासदार संजयकाका पाटील यांनी जिल्हा परिषद सीईओ तृप्ती धोडमिसे यांच्याकडे केली.

याबाबत समजलेली माहिती अशी की, गव्हाण ग्रामपंचायतीच्या मालकीची सुमारे ५० एकर गायरान जमीन या मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी प्रकल्पासाठी ठरावाद्वारे देण्यात आली होती. हा ठराव १ मे २०२३ रोजी घेतल्याचे कागदपत्रावरून दिसून येते. परंतु हा ठरावच बोगस दिला असल्याचा ग्रामस्थांचा दावा आहे. या तारखेला कोणतीच ग्रामसभा झाली नव्हती व ग्रामसभेपुढे असा कोणताच सौरऊर्जा प्रकल्पासंदर्भात विषय आला नव्हता. त्यामुळे या प्रकल्पासाठी दिलेला हा ठराव व या ठरावावरील ग्रामस्थांच्या सह्या या बोगस असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या ठरावा द्वारे मंजूर झालेला सौर कृषी ऊर्जा प्रकल्प गेल्या अडीच महिन्यांपूर्वी याची आखणी करण्यात आली होती. तर गेल्या वीस ते पंचवीस दिवसापूर्वी या प्रकल्पाची प्रत्यक्ष कामाची सुरुवात करण्यात आली होती. परंतु या कामाला ग्रामस्थाकडून विरोध केला व हे काम बंद पाडले.

गटविकास अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश

गव्हाण येथिल मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्पाच्या जागे प्रकरणी तक्रार आली आहे. याबाबत चौकशी करून अहवाल देण्याचे आदेश तासगाव गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल अशी माहीती सीईओ तृप्ती धोडमिसे यांनी दिली.

घरात घुसून महिलेचे दागिने लंपास; तिघांना अटक

केसरी वृत्तसेवा

सांगली : शहरातील संजयनगर येथील संगीता ठोंबरे या महिलेच्या घरात रात्री घुसून चाकूच्या धाकाने तिचे दागिने चोरून नेणाऱ्या तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चोरीचे दागिने, मोबाईल असा ९० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. संजयनगर पोलिसांनी ही कारवाई केली.

वाहीद मुसा पखाली (वय ४९, रा. शिंदे मळा), सलीम मेहबूब शेख (वय ३५, रा. टिंबर एरिया), तातोबा लक्ष्मण कांबळे (वय ५०, रा. नवीन वसाहत, सांगली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. दि. ५ जुलै रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास तिघेही संशयित संजयनगर येथील दत्त कॉलनीत राहणाऱ्या संगीता ठोंबरे यांच्या घरात घुसले. त्यांनी महिलेच्या पोटाला चाकू लावून तसेच गळ्याला विळा लावून तिने घरात ठेवलेले दागिने लंपास केले होते. याप्रकरणी महिलेने संजयनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. सांगली शहरचे उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव यांनी यातील संशयितांना तातडीने पकडण्याच्या सूचना गुन्हे प्रकटीकरण शाखेला दिल्या होत्या. गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील संतोष पुजारी गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील संतोष पुजारी, सुशांत लोंढे यांना ही जबरी चोरीवरील तीनही संशयितांनी केल्याची माहिती खबऱ्याद्वारे मिळाली. त्यानंतर पथकाने तिघांनाही सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

निधन वार्ता

मारूती माने

शिराळ : शिराळे खुर्द पुनवत (ता.शिराळा) येथील प्रतिष्ठित नागरिक, ज्ञानज्योत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, ज्येष्ठ पैलवान मारूतीराव पांडुरंग माने (आंदळकर) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. शिराळे खुर्द गावचे विद्यमान लोकनियुक्त सरपंच व ज्ञानज्योत शिक्षण संस्थेचे सचिव पै.दत्ताजी माने (आंदळकर) यांचे ते वडील होतं. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली सुना, नातवंडे असा परिवार आहे. रक्षाविसर्जन गुरुवार दिनांक ११ रोजी दहा वाजता आहे.

Indira Gandhi Mahila Sahakari Soot Girani Ltd., Shivnakwadi - 416143

Tal-Shirol, Dist-Kolhapur, Contact No.9822321456, 9850993281.

E-Tender cum Auction Notice for Sale of Old Spinning Machineries.

The undersigned invites online E-Tender cum Auction from interested parties to Sale Old Spinning Machineries on following address At-Mill site, Shivnakwadi - 416143, Tal-Shirol, Dist-Kolhapur.

The application shall be submitted online in the website http:/mahatenders.gov.in

Documents submission Start Date 11/07/2024 at 11.00 am. Please refer tender document available on http:/mahatenders.gov.in for details.

For - Indira Gandhi Mahila Sahakari Soot Girani Ltd., Shivnakwadi.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन कक्ष, आरोग्य विभाग, मुख्यालय जाहीर निविदा सूचना क्र. ०३/२०२४-२५

महानगरपालिका मालकीच्या अमरधाम स्मशानभुमी, सांगली येथील गॅस शवदाहिनी व मिरज कृष्णाघाट येथील डिझेल दाहिनी दुरूस्त करणेकामी एजन्सी नियुक्तीसाठी जाहीर सूचना क्र. ०३/२०२४-२५ करीता ई-निविदा मागविणेकामी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे. सदरची ई-निविदा दि. ११/०७/२०२४ पासून दि. २५/०७/२०२४ रोजी सायं. ४:०० वा. पर्यंत उपलब्ध राहिल व दि. २६/०७/२०२४ रोजी सायं. ४:०० वा. निविदा कमिटीसमोर उघडणेत येईल. निविदेबाबत सर्व शर्ती अटी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहणेस उपलब्ध आहे.

डॉ. रविंद्र ताटे
वैद्य. आरोग्याधिकारी (SWM)
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

फॉर्म जी
विल्सन्स रूफिंग प्रॉडक्ट प्रा. लि.
स्वारस्य व्यक्त करण्यासाठी आमंत्रण

एस्बेस्टोस सिमेंट शीटमध्ये कार्यरत बिलासपूर (छत्तीसगढ) आणि कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे (भारतीय दिवाळखोरी आणि दिवाळखोरी बोर्ड (कॉर्पोरेट व्यक्तींसाठी दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) विनियम, २०१६ च्या नियमन ३६ च्या उप-नियम (१) अंतर्गत)

तपशिल

१	कार्पोरेट कर्जदाराचे नाव, पॅन नं. आणि सीआयएन/एलएलपी नं. सह	विल्सन्स रूफिंग प्रॉडक्ट प्रा. लि.
२	कार्पोरेट कर्जदाराच्या प्रधिकरण समावेशाची तारीख	२३/०८/२००४
३	कार्पोरेट कर्जदार ज्यांच्या अंतर्गत स्थापित/नोंदणीकृत आहे असे प्राधिकरण	कंपनी निबंधक कार्यालय, पुणे
४	कार्पोरेट कर्जदाराचा कार्पोरेट आयडेंटिटी नं./लिमिटेड लायबलिटी आयडेंटीफिकेशन नं.	यू २६९५३ पीएन २००४ पीटीसी ०१९६६९
५	नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता	विल्सनस टॉवर, १२२०/४७, ई वॉर्ड, पोपटराव जगदाळे हॉलच्या समोर, राजारामपूरी, पहिली गल्ली, कोल्हापूर ४१६००८
६	वेबसाईट	https://vilsonsroofingproduct.com/
७	बहुतांश अचल मालमत्ता जेथे आहे ते ठिकाण	प्लॉट नं. २३, २४, २५ आणि २६ सिल्पहारी औद्योगिक वसाहत, ता. बिल्हा, जि. बिलासपूर, छत्तीसगढ प्लॉट नं. सी-२/१, सी-२ आणि सी-२ (भाग) कागल-हातकणंगले पंचतारांकित औद्योगिक वसाहत, पट्टणकोडोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. महाराष्ट्र
८	दोन वर्षांच्या अंतिम उपलब्ध आर्थिक विवरणांसह (शेड्युलसह) पुढील तपशील, कर्जदारांच्या याद्या URL वर उपलब्ध आहेत:	स्वारस्य अभिव्यक्तीसाठी तपशीलवार आमंत्रण खालील वेबलिंकवर उपलब्ध पहा: https://vilsonsroofingproduct.com/
९	संहितेच्या कलम २५(२)(ह) अंतर्गत रिझोल्यूशन अर्जदारांसाठी पात्रता URL वर उपलब्ध आहे:	स्वारस्य अभिव्यक्तीसाठी तपशीलवार आमंत्रण खालील वेबलिंकवर उपलब्ध पहा: https://vilsonsroofingproduct.com/
१०	दिवाळखोरी सुरु होण्याची तारीख	२७-१०-२०२३
११	स्वारस्य अभिव्यक्ती प्राप्त करण्याची अंतिम तारीख	२६-०७-२०२४
१२	संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांची तात्पुरती यादी जारी करण्याची तारीख	०५-०८-२०२४
१३	तात्पुरत्या यादीवर आक्षेप सादर करण्याची शेवटची तारीख	१०-०८-२०२४
१४	संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारची अंतिम यादी जारी करण्याची तारीख	२०-०८-२०२४
१५	मेमोरँडम, मूल्यांकन मॅट्रिक्स माहिती जारी करण्याची आणि संभाव्य रिझोल्यूशन अर्जदारांना ठराव योजनांसाठी विनंती तारीख	२५-०८-२०२४
१६	ठराव योजना सादर करण्याची शेवटची तारीख	२४-०९-२०२४
१७	सीओसी मंजूर ठराव आराखडा मंजुरीसाठी अधिनिर्णय प्राधिकरणाकडे सादर करण्याची अंदाजे तारीख	२४-१०-२०२४
१८	रिझोल्यूशन प्लॅन, मूल्यांकन मॅट्रिक्स, माहिती ज्ञापन आणि पुढील माहितीसाठी विनंती प्राप्त करण्याची पद्धत	स्वारस्य अभिव्यक्तीसाठी तपशीलवार आमंत्रणात नमूद केल्यानुसार संबंधित उपक्रम आणि संलग्नकांसह स्वारस्य अभिव्यक्ती सादर करा: cirp.vilsons@gmail.com
१९	ठराव व्यावसायिकाना ठराव सादर करण्याची पद्धत	रिक्वेस्ट फॉर रिझोल्यूशन प्लॅन (RFRP) मध्ये पात्र संभाव्य रिझोल्यूशनसाठी जारी करण्याची पद्धत नमूद केली जाईल
२०	ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	कु. वंदना गर्ग रजि. क्रमांक: IBBI/IP--001/IP-P00025/2016-17/10058
२१	बोर्डाकडे नोंदणीकृत रिझोल्यूशन व्यावसायिकाचे नाव, पत्ता आणि ई-ईमेल	कु. वंदना गर्ग - Vskgarg0899@gmail.com युनिट ३०७, तिसरा मजला, एक्सजेलेन्सिया लोढा सुप्रीम्स २, वागळे इस्टेट, पाचपाखाडी, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४
२२	रिझोल्यूशन व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी पत्ता आणि ईमेल	कु. वंदना गर्ग - cirp.vilsons@gmail.com युनिट ३०७, तिसरा मजला, एक्सजेलेन्सिया लोढा सुप्रीमस २, वागळे इस्टेट, पाचपाखाडी, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४
२३	एक्स्प्रेशन ऑफ इंटरेस्ट सबमिट करण्यासाठी ईमेल करा. आयडी	cirp.vilsons@gmail.com

सही/- **कु. वंदना गर्ग**
विल्सन्स रूफिंग प्रॉडक्ट प्रा. लि.साठी ठराव व्यावसायिक
रजि.नं. आयबीबीआय/आयपीए-००१/आयपी-पी०००२५/२०१६-१७/१००५८
युनिट ३०७, तिसरा मजला, एक्सजेलेन्सिया लोढा सुप्रीम्स २, वागळे इस्टेट, पाचपाखाडी, ठाणे, महाराष्ट्र - ४००६०४
११ जुलै २०२४ स्थळ : मुंबई

मा. सचिव राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण म. रा. पुणे यांचेकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/नैमित्तीक रिक्त जागा भरणे/कार्यपध्दती निश्चीती/२०२२/३२६६. सन २०२२.दि.१९/४/२०२२ सोबत जोडलेले परीशिष्ट -१
साईनाथ सर्व सेवा सहकारी सोसायटी लि. मिटकी, तालुका आटपाडी, जिल्हा सांगली

नोटीस मसूदा

दिनांक ०५/०७/२०२४

साईनाथ सर्व सेवा सहकारी सोसायटी लि. मिटकी, तालुका-आटपाडी, जिल्हा-सांगली या संस्थेच्या सर्व सचांलाकाना सुचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण मतदारसंघातील रिक्त पद -१ अशी नैमित्तीकपणे रिक्त झालेल्या १ संचालकाच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी श्री. एस. बी. गवंड, याचे अध्यक्षतेखाली दिनांक १६/०७/२०२४ दु. ०१.०० वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था आटपाडी कार्यालयत या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन केले आहे. सर्व संचालकानी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत अवाहन करण्यात येते आहे. सभेत संचालकामधून निवडावयाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी हजर रहावे.

-: निवडणूक कार्यक्रम :-

अ.क्र.	तपशील	वेळ
१	नामनिर्देशन पत्र वाटप व स्वीकृती	दुपारी १.०० ते दुपारी १.१५
२	नामनिर्देशन पत्राची छाननी	दुपारी १.१५ ते दुपारी ०१.३०
३	वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिध्द करणे	दुपारी १.३५
४	नामनिर्देशन पत्र माघार	दुपारी १.३५ ते ०२.००
५	अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे	दुपारी ०२.००
६	मतदान प्रक्रिया	दुपारी ०२.०५ ते दुपारी ०२.३०
७	मतमोजणी प्रक्रिया	मतदान झालेनंतर
८	निवडून आलेल्या पदाधिकाऱ्याबाबत निकाल घोषीत करणे.	मतमोजणी झालेनंतर लगेच

(मा. अध्यासी अधिकारी याचे मान्यतेने.) **सचिव**
सभेचे दिनांक :- १६/०७/२०२४
ठिकाण- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था आटपाडी

महावितरण — **ई-निविदा सुचना**

सांगली शहर विभागाअंतर्गत खालीलप्रमाणे ई निविदा मागविण्यात येत आहेत

अ.क्र.	कामाचे स्वरूप	कार्यालयाचे नाव	निविदा क्र
१	सांगली शहर विभागीय कार्यालायाकरीता ३ वर्षासाठी भाडे तत्वावर कार/तत्सम वाहन घेणेकरिता.	सांगली शहर विभागीय कार्यालय	टी-११/२०२४-२५

सदर निविदा भरण्याची अंतिम मुदत दि १७.०७.२०२४ वेळ २३.५५ वा अशी राहील. सविस्तर ई-निविदा https://etender.mahadiscom.in/eatApp/ ह्या संकेत स्थळावर उपलब्द्ध आहेत.
संपर्क - कार्यकारी अभियंता , महावितरण विभागीय कार्यालय, सांगली शहर
मोबाईल क्र - ७८७५७६९४७१
कार्यकारी अभियंता सांगली शहर विभाग

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. — **SRM-Tender Notice**

Digitally signed online bids are invited for following tender through SRM-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL.

SRM Tender & Rfx No.	Particulars	Estimated cost Rs.	E.M.D. (1% of est. cost) in Rs.	Tender cost in Rs.	Sale Period	Last Date of Submission	Date of opening (Tech. bid)
T-10/2024-25/ RFx. No. 7000026192 - IIIrd Call	Annual Contract for loading, unloading and transportation of various S/s equipments / material under EHV O&M Division Sangli.	Rs. 10,00,000/- Including of GST	Rs. 10,000 /-	590/-	11/07/2024 to 17/07/2024 up to 23:59 Hrs.	17/07/2024 up to 23:59 Hrs.	18/07/2024 at 11:00 Hrs onwards; if possible

Contact Person:- The Dy. Executive Engineer, Mob. 8411001487. 0233-2305816, for further details please visit to http://srmetender.mahatransco.in. **Executive Engineer, MSETCL, EHV O&M Dn., Sangli**